|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## निवडणूक शाखा

जा.क्र. कबचौउमवि /नि.शा.०२/३०८/२०२३ दिनांक : २७/०४/२०२३

१) कबचौउमविशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक
२) मा.संचालक/विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, कबचौउमवि, जळगाव
३) सर्व संबंधित विद्या परिषदेचे नवनियुक्त मा. सदस्य

विषय :- **विद्या परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या नावांची अंतिम यादी (Final List of Contesting Candidates) जाहीर करणे बाबत ....**

संदर्भ :- १. जा.क्र. कबचौउमवि/नि.शा.०२/२८६/२०२३, दि.११/०४/२०२३ चे पत्र
२. निवडणूक सूचना/कार्यक्रम (Notice/Progamme of Election) नोटीफिकेशन नं. १०५/२०२३, जा.क्र.कबचौउमवि/२/नोटीस ऑफ इलेक्शन/एसी ते एमसी/२८७/२०२३ दि. १२ /०४/२०२३
३. जा.क्र. कबचौउमवि/नि.शा.०२/२८८/२०२३, दि.१२/०४/२०२३ चे पत्र
४. जा.क्र. कबचौउमवि/नि.शा.०२/३०१/२०२३, दि.२५/०४/२०२३ चे पत्र
५. जा.क्र. कबचौउमवि/नि.शा.०२/३०५/२०२३, दि.२६/०४/२०२३ चे पत्र

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४) (ज) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी विद्या परिषदेचे सदस्य असलेल्या निर्वाचित अध्यापक व महिला यांच्या प्रतिनिधीमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरीता संदर्भ क्र. २ च्या अधिसुचनेनुसार निवडणूक सूचना/कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आली होती.

तसेच संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये विद्या परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी मतदान करण्यास पात्र असलेल्या विद्या परिषद सदस्यांची सुधारित यादी / अद्ययावत यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार विद्या परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडीसाठी वैध/अवैध ठरलेल्या नामनिर्देशनाची यादी (Valid and Invalid Nominations-List) संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये प्रसिध्द झाल्यानंतर, दि.२६/०४/२०२३ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत दाखल अपिलांवर मा. कुलगुरु महोदयांनी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने वैध / अवैध ठरलेल्या नामनिर्देशनाची यादी पत्र क्रमांक ५ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती.

विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार तसेच निवडणूक सुचनेनुसार वैध ठरलेल्या नामनिर्देशनाचे यादीतुन त्यांचे नामांकन मागे (withdrawal of nomination) घेणेसाठी दि. २७/०४/२०२३ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत वेळ विहीत करण्यात आलेली होती. **त्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या गटाकरिता निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या नावांची अंतिम यादी (Final List of Contesting Candidates) या पत्रान्वये जाहीर करण्यांत येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

कृपया सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

**सोबतः-** व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी वैध ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी.

Xp: SKC_ Notice of Election_ Chairperson 2022